॥ ज्ञानम् जीवनस्य भूषणम् ॥
YSPM
NAAC B+

# YASHODA TECHNICAL CAMPUS, SATARA

NH-4, Wadhe Phata, Satara., Tele Fax- 02162-271238/39/40

Website- www.yes.edu.in, Email- registrar_ytc@yes.edu.in>

Approved by AICTE- New Delhi, Govt. of Maharashtra (DTE, Mumbai)

Affiliated to DBATU Lonere, Shivaji University, Kolhapur / MSBTE, Mumbai.

**Prof. Dasharath Sagare**
Founder, President

**Mr. G. K. Suravase**
Registrar

**Ref. No. - YSPM/YTC/ NOTICE/ 19 / 2024-25** **Date: -25/07/2024**

# नोटीस

**संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी, सातारा यांचे पत्र जा. क्र.मह/नै.आ./कावि/२९१/२०२४ दि.२५/०७/२०२४ च्या आदेशानुसार.**

यशोदा टेक्निकल कॅम्पस, यशोदा कॉलेज ऑफ फार्मसी व यशोदा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सातारा मधील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सातारा यांच्या आदेशानुसार जिल्हयामध्ये अतिवृष्टी होत असल्याने महाविद्यालयास उद्या दि. २६ जुलै २०२४ रोजी सुट्टी राहील. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

Yashoda Technical Campus 6757 Satara

Registrar
Yashoda Technical Campus
Satara

प्रत:- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१ प्राचार्य, यशोदा कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड पॉलीटेक्निक
२ प्राचार्य, यशोदा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर
३ कुलसचिव, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, सातारा
४ विभाग प्रमुख, डी. फार्म, बी. फार्म, एम. फार्म
५ विभाग प्रमुख एम.बी.ए.
६ विभाग प्रमुख एम.सी.ए.
७ विभाग प्रमुख बी.सी.ए.
८ विभाग प्रमुख बी.बी.ए.

महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सातारा

## आपत्ती व्यवस्थापन विभाग

फोन नं. ०२१६२-२३२१७५ ई-मेल:- rdcsatara@gmail.com

क्र.मह/नै.आ./कावि/२७१ /२०२४ दिनांक: - २५/०७/२०२४

वाचले- 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.

2. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय यांचे परिपत्रक क्र. संकिर्ण-2019/प्र.क्र.199/एसडी-2 दि 02/08/2019.

3. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-2019/प्र.क्र. 199/एसडी-2 दि. 23/12/2019

4. विभागीय उपसंचालक मुंबई यांचेकडील पत्र क्र. सिउर्स माध्यमिक/संकिर्ण/2022/7077, दि.13/07/2022

5. भारतीय हवामान विभाग मुंबई यांचेकडील पूर्वसूचना दिनांक: 25/07/2024.

### आदेश

**ज्याअर्थी,** उक्त वाचले क्र. 4 अन्वये प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्वसूचनेनुसार जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेवून, संपूर्ण जिल्ह्याकरिता अथवा जिल्ह्यातील स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व वाचले क्र.2 च्या शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

**ज्याअर्थी,** भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार दिनांक 25 व 26 जुलै 2024 रोजी सातारा जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा (Heavy to very Heavy Rainfall at few places with extremely heavy rainfall at Isolated places) रेड अलर्टचा इशारा देण्यात आलेला असून सातारा जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीमध्ये अतिवृष्टी होत आहे. हवामान विभागाने येत्या काही तासात सातारा जिल्हयात आणि घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला असल्याने सातारा जिल्हयातील शाळा 26 जुलै 2024 रोजी सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद ठेवणे आवश्यक असल्याचे माझे मत झाले आहे. नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे या सर्व बाबींचे अवलोकन करता सातारा जिल्हयातील सर्व माध्यमांच्या शाळा व महाविद्यालये तसेचअंगणवाडी यांना दिनांक 26 जुलै 2024 रोजी एक दिवसाची सुट्टी जाहिर करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सातारा मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबईच्या शासन परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये सातारा जिल्हयातील सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी व खाजगी प्राथमिक व माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका, अनुदानित व विना अनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये व औदयोगिक प्रशिक्षण संस्था यांचे आस्थापनेवरील शैक्षणिक संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना दिनांक 26 जुलै 2024 रोजी सुट्टी जाहिर करीत आहे. तथापि, या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत संबधीत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज करतील, तसेच इयत्ता 10वी व 12वी च्या जुलै 2024 च्या फेर परीक्षा राज्य मंडळ पुणे यांचे वेळापत्रकानुसार सुरू राहतील.**

उक्त आदेशाची अमंलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेश आज दिनांक 25 जुलै 2024 रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

(जितेंद्र डुडी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,सातारा.**

**प्रत - सर्व संबंधितास — माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.**